ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

# मुस्लिमस्त्रीयांची आर्थिक साक्षरता विशेष संदर्भ औरंगाबाद शहर

**साहेब वि.पडलवार**
(सहा.प्राध्यापक) समाजशास्त्र विभाग प्रमुख
ज.जि.म.वि.प्र. समाजाचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय जळगाव.
**अलमास अंजुम अहेफाज खान** (संशोधक विद्यार्थीनी)

★★★

**प्रस्तावना** – कुठल्याही समाजाच्या विकासात निम्मा वाटा हा त्या समाजातील स्त्री चा असतो. जेवढ समाजामध्ये स्त्रीला कनिश्ठ स्थान असेल त्या समाजाच्या विकासाची गती तेवढी मंदावलेली असते. समाजाचा विकास जलद आणि चिरंतर करावयाचा असेल तर देशाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय विकासात स्त्रीयांचा सहभाग आवष्यक आहे. हे सत्य सर्वांनाच माहीत आणि मान्य असून देखील पितृसत्ता समाज व्यवस्थेत स्त्रीयांना रूढी, प्रथा,परंपरेने जखडलेले आहेत. सर्व सत्ता ही पुरुषांच्या हाती आहे, स्त्रीला प्रत्येक वेळेस दुय्यमत्व स्वीकारव लागलं आहे. आजही मुस्लिम महिलांची स्थिति बघीतली तर ती असमाधान कारक आहे. पितृसत्ता कुटुंबपद्धती, पुरुषवर्चस्व, कुटुंबात देण्यात येणार कनिष्ठतेची भावनेमुळे मुस्लिम स्त्रिया तुलनेने अजूनही मागासलेली आहे. त्यातही आर्थिक व्यवहार करण्यास आणि निर्णय घेण्यास ती सक्षम नाही, ती जरी स्वतः कमवती असली तरी निर्णय घेण्याची अधिकार तिच्या हातात पुरुशांच्या तुलनेने कमीच आहे. मोठ मोठे व्यवहार, गुंतवणुकी हे सर्व निर्णय पुरुशांच्याच हाती आहेत हे आपल्याला रोजच्या निरक्षणातून दिसून येईल. आपण आर्थिक साक्षर होणे म्हणजे अगदी सोप्या शब्दात श्आपल्या उत्पन्नाचा आणि खर्चाचा मेळ घालून योग्य ठिकाणी गुंतवणूक करणे आणि कुवतीनुसार जोखीम घेऊन चांगला परतावा मिळवणे होय. येणाऱ्या काळात आर्थिक साक्षरता ही सर्वांसाठी अत्यंत गरजेची गोष्ट होणार आहे. कारण आपल्या आजूबाजूला ज्या झपाट्याने बदल होत आहेत ते तर आपण टाळू शकत नाही. आपल्या उत्पन्नाचा आणि खर्चाचा मेळ घालणे आणि चांगला परतावा मिळवणे हे आर्थिक साक्षरतेचे निकश म्हणता येतील. आपल्याला वाटते तेवढे ते अवघड नाही. अत्यंत सोपे ठोकताळे वापरून आपण ते बऱ्याच अंशी साध्य करू शकतो.

"मुस्लिम स्त्रियांची आर्थिक साक्षरता" विशेष संदर्भ औरंगाबाद शहरातील वस्ती प्रस्तुत विषयांमध्ये मुस्लिम स्त्रियाना बँकेविषयी माहती आहे का ?, बँकेचे व्यवहार खाते सुरू करणे, पैसे जमा करणे, काढणे, ऑनलाईन बँकिंग, कॅशलेस व्यवहार , व्यवहारासाठी मोबाइल, लॅपटॉप,संगणकचा वापर करता का? , विमा विषयी किती प्रमाणात स्त्रियांना माहीती आहे ?, असल्यास किती स्त्रियानी स्वतःचा विमा उतरविला आहे ?, करविशयक व बचती विशयी नियोजन किती आणि कसे करतात ? त्यामध्येही स्वतः स्त्री किती प्रमाणात करतात ?, की पती किंवा कुटुंबातील इतर पुरुश निर्णय घेतात या वरुन स्त्रीयांची आर्थिक साक्षरतेचे अध्ययन करण्यात आलेले आहे.

अर्थरू सरळ साध्या आणि सोप्या भाशेत आर्थिक साक्षरता म्हणजे पैसे काय आहेत ? आणि पैषांच्या साहाय्याने आपण काय काय करू शकतो ?, पैसे कुठे आणि कशासाठी खर्च करायला हवेत?, भविष्याच्या दृष्टीने पैशांच नियोजन करणे ह्या गोष्टींचे ज्ञान असणे म्हणजेच आर्थिक साक्षरता होय.

**संशोधनाच उद्दिष्टे–**

१) वस्तीत राहणाऱ्या मुस्लिम स्त्रियांच्या बचत व गुंतवणूक विषयीक प्रवृत्तीचा अभ्यास करणे.

२) वस्तीत राहणाऱ्या मुस्लिम स्त्रियांमधील बँकिंग व्यवहार व विमा विषयक व्यवहारांची माहिती जाणून घेणे व खर्च व कर प्रवृत्तीचा अभ्यास करणे.

३) राष्ट्रीयकृत बँकेविषयी योजनांची माहिती आहे किंवा नाही हे जाणून घेणे. ४)स्वतः मोठे आर्थिक व्यवहार तसेच व्यवहारासाठी इंटरनेट, मोबाईल, कॉम्प्युटर ई. साधनांचा वापर करतात की नाही हे जाणून घेणे.

**गृहीतकृत्ये**

१) औरंगाबादमधील वस्तीत राहणाऱ्या मुस्लिम स्त्रिया स्वतः आर्थिक व्यवहार करत नाही.

२) औरंगाबादमधील वस्तीत राहणाऱ्या मुस्लिम स्त्रिया ऑनलाईन बँकिंग करत नाही.

३) औरंगाबादमधील वस्तीत राहणाऱ्या मुस्लिम स्त्रिया बँकेचे सर्व व्यवहार स्वतः करत नाही.संशोधन पद्धती प्रस्तुत संशोधनासाठी प्रथमिक आणि द्वितीयक सामग्रीचा वापर करण्यात आला आहे. प्राथमिक आधारसामग्री जमा करण्यासाठी नमूना निवड पध्दतीचा संभाव्य नमूना निवड पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. नमूना म्हणून औरंगाबाद मधील वस्तीत राहणाऱ्या ३० मुस्लिम स्त्रियांकडून मुलाखात अनुसूची च्या साह्याने तथ्य जमा करण्यात आले आहे. प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक आणि द्वितीयक सामग्रीचा वापर करण्यात आलेला आहे. प्रत्यक्ष मुलाखात, इंटरनेट, जनगणना अहवाल ई. माहिती तथ्याच्या सहाय्याने संशोधन केल आहे.

**विश्लेषण** – प्रस्तुत संषोधनामध्ये प्रष्नावलीच्या साह्याने तथ्य संकलन करुन विष्लेशण करण्याच्या प्रयत्न करण्यात आलेला आहे. त्यातले काही निवडक महत्वाचे प्रष्नांचे विष्लेशण, आणि स्पष्टीकरण पुढील प्रमाणे करण्यात आले आहे. ज्यामध्ये एकूण ३० नमूना पैकी टक्केवारीच्या साह्याने विष्लेशण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. औरंगाबाद शहरातील वस्ती मध्ये राहणाऱ्या मुस्लिम स्त्रियांच्या एकूण ३० नमून्या पैकी करविषयक व बचतीविषयक नियोजना विषयी माहितीच्या अभ्यास केला असता असे स्पष्ट होते की निवडलेले ३० नामूना पैकी १० मुस्लिम स्त्रिया कर व बचतीविषयक नियोजन करतात तर २० स्त्रिया ह्या करत नाही. यावरुन साधारणतः ६६.६७ः मुस्लिम स्त्रियाना करविषयी व बचती विषयीक माहीती नसेल किंवा याविषयी काम कसे करायचं हे माहिती नसेल.

विमाविषयी माहितीचा अभ्यास या मुद्याचे अध्ययन करताना असे आढळून आले की, ३० पैकी केवळ ५ स्त्रियांना विमा विशयी सखोल माहिती होती, तसेच विमा विशयी माहीती नसलेल्याची संख्या २५ होती. म्हणजे केवळ १६.६७ः औरंगाबाद मध्ये वस्तीत राहणाऱ्या मुस्लिम स्त्रीयाना विमा विषयी माहिती आहे आणि ८३.३३ः स्त्रियाना विमा विषयी माहिती नाही. या प्रमाणेच ३० पैकी केवळ ४ स्त्रीया म्हणजे १३.३३ः अशे आढळून आले की जे बँकेच्या सर्व व्यवहार स्वतः करतात, बाकी २६ म्हणजेच ८६.६६ः स्त्रिया पतीच्या साह्याने बँकेच्या व्यवहार करतात. ऑनलाईन बँकिंगच्या संदर्भात अभ्यास करताना

**गृहितकृत्याची पडताळणी –**

१) औरंगाबादमधील वस्तीत राहणाऱ्या मुस्लिम स्त्रिया स्वतः मोठे आर्थिक व्यवहार करत नाही. मुलाखत अनुसूची च्या साह्याने संकलन केलेल्या तथ्याचे आधारे १३.३३टक्के स्त्रिया स्वतः मोठे आर्थिक व्यवहार करतात तर ८६.६६टक्के मुस्लिम स्त्रिया ह्या स्वतः मोठे आर्थिक व्यवहार करत नाही. यावरून गृहितकृत्य क्र. १ सिद्ध झाले.

२) औरंगाबादमधील वस्तीत राहणाऱ्या मुस्लिम स्त्रिया ऑनलाईन बँकिंग करत नाही. प्रसूत संशोधनामध्ये एकूण स्त्रियांच्या ९०ः स्त्रिया ह्या ऑनलाईन बँकिंग करत नाही तर १० टक्के स्त्रिया ह्या ऑनलाईन बँकिंग करतात. यावरून गृहितकृत्य क्र. २ सिद्ध झाले.

३) औरंगाबादमधील वस्तीत राहणाऱ्या मुस्लिम स्त्रिया बँकेचे सर्व व्यवहार स्वतः करता नाही. एकूण स्त्रियांपैकी १३.३३ टक्के बँकेच्या सर्व व्यवहार स्वतः करतात, बाकी २६ म्हणजेच ८६.६६टक्के स्त्रिया पतीच्या साह्याने बँकेच्या व्यवहार करतात. यावरून गृहितकृत्य क्र. ३ सिद्ध झाले.

**निष्कर्ष** – तथ्य संकलन, तथ्यांच विश्लेषण, गृहितकृत्याची पडताळणी या सर्व गोष्टींचा अध्ययन केल्यानंतर निदर्शनास येत की मुस्लिम स्त्रीला अजूनही प्रवाहसोबत बदलण्यास अनेक अडचणी आहेत. सर्व आर्थिक व्यवहाराकरीता मुस्लिम स्त्री ही अजूनही पुरुषांवर अवलंबून आहे. स्त्रियांच समाजिक दर्जा बादलवायचा असेल तर स्त्रीला आर्थिक स्वावलंबी होणे, आर्थिक साक्षर होणे गरजेच आहे. आर्थिक साक्षरतेमुळे सामाजिक, आर्थिक स्थिती बदलेल महिलांना त्यांच्या क्षमतांची जाणीव करून वैयक्तिक स्वातंत्र्य व निर्णय घेण्याचा अधिकार मिळण्यास मदत होईल.

**शिफारसी–**

१) मुस्लिम स्त्रियांसाठी करविशयक आणि बचतविशयक नियोजन कसे करावे तसेच बचत कोणत्या गोष्टीमध्ये करावी या विषयीचे ज्ञान तसेच जनजागृती करावी.

२) मुस्लिम स्त्रियांनी गुंतवणूकीमधील सहभाग वाढविला पाहिजे तसेच स्त्रीयांनी काशामध्ये गुंतवणूक केली? त्याचा हातभार देशाच्या विकासासाठी लागेल जसे की, स्त्रियांना सोन्या, चांदी, मध्ये गुंतवणूक करण्याऐवजी बँक, रोखे बाजार, म्यूचुअल फंड ई. मध्ये गुंतवणूक करायला पाहिजे यावविषयीचे मार्गदर्शन शासनाने वारंवार करायला हवे.

३) कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्तिनी स्त्रीविषयीचा दृष्टिकोण बदलावा लागेलच, जेणेकरून स्त्रीयांना आर्थिक व्यवहार करण्यास संधी मिळेल तसेच मोठ्या आर्थिक व्यवहारविशयी माहिती मिळेल व समाजातील स्त्रीयांचा दर्जा उंचावेल.

४) बँकच्या योजनांची जनजागृती करायला हव्या जेणेकरून सर्वांना योजनेविषयी माहिती होईल व योजनांचा लोक उपभोग घेऊ षकतील.

५) आधुनिक तंत्रज्ञानाविषयी माहिती प्रशिक्षण प्रत्येक घरातील स्त्रियां पर्यन्त पोहोचवली पाहिजे. ऑनलाइन बँकिंग ई. गोष्टींच्या वापराचे फायदे काय आहेत? या विषयी जनजागृती करायला हवी.

***संदर्भ ग्रंथ***

1. *डॉ. गीताली मंदाकीनी " स्त्रीप्रश्न सोडवताना ", दिलीपराज प्रकाषन प्रा.लि.,शनीवारपेठ पुणे.*

2. *डॉ नारायण भोसले "जात वर्ग लिंगभाव इतिहाससमीमांसा ",अथर्व पब्लिकेशन ,धुळे.*

3. *डॉ नारायण भोसले "अब्राम्हणी स्त्रीवाद ",अथर्व पब्लिकेश,धुळे.*

4. *वंदना सोनाळकर ,शर्मिला रेगे "पितृसत्ता व स्त्रीमुक्ती "क्रांतीसिंह नाना पाटील अकादमी , अहमदनगर डॉ अशाक चौसाळकर धर्म समाज आणि राजकारण ", लोकवाडमय गृह, मुंबई*